
# जे आहे तुझे तुजपाशी

पर्णवी ब्रह्मकुळे रावळ



साहित्य प्रतिष्ठान

# जे आहे तुझे तुजपाशी

**पर्णवी ब्रम्हकुळे रावळ**

**ई साहित्य प्रतिष्ठान**

पुस्तकाचे नांव : जे आहे तुझे तुझपाशी..
प्रकार: अनुभव

लेखिका: : पर्णवी ब्रम्हकुळे रावळ
Phone : 8855064102
parnavi.raval@gmail.com

मुद्रांकन व मांडणी: गौरी वीरकर
रेखाटने : जितेंद्र कुलकर्णी

प्रकाशन: ई साहित्य प्रतिष्ठान
esahity@gmail.com
www.esahity.com

नाताळ २०१३ (२५-१२-२०१३)

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी अथवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.
या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे असून, पुस्तकाचे अथवा त्यातील भागाचे पुनर्मुद्रण अथवा कोणत्याही प्रकारचे रुपांतर, भाषांतर, नाट्य, चित्रपट इत्यादी करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2013

# अर्पण पत्रिका

हे पुस्तक मी

माझे आई, वडील, मावशी, माझी सर्व भावंडे,

दीर आणि सासू सासरे यांना अर्पण करते.

संपूर्ण ब्रम्हकुळे, सोने, रावळ, चतुर्भुज परिवार

यांच्या आशीर्वादाने हे शक्य होऊ शकले.

सगळ्यात मोठे आभार मी माझा नवरा दिनेश याचे मानते.

तो माझ्या प्रत्येक कलागुणांना वाव देतो.

खरेच तुम्हा सर्वांना खूप धन्यवाद.

तुमच्या सदिच्छा, आशीर्वाद असेच माझ्या पाठीशी असू देत..

पर्णवी ब्रम्हकुळे रावळ

# प्रस्तावना

लग्न म्हणजे दोन जीवांचं, कुटुंबांचं मीलन. भारतीय संस्कृतीत लग्नाला जितकं वैयक्तिक महत्व आहे, तितकंच सामाजिकही आहे. लग्न ही अशी गोष्ट आहे, की ज्यामुळे त्या व्यक्तीचं संपूर्ण आयुष्य बदलू शकतं. हा बदल चांगला किंवा वाईटही असू शकतो. आता हा बदल कसा असेल हे आपल्या आयुष्यात येणाऱ्या व्यक्तीवर अवलंबून असतं.

तर अशी ही महत्वाची व्यक्ती; आपल्यासाठी निवडायला संपूर्ण कुटुंब कामाला लागतं. भारतामध्ये जातिभेद, धर्मभेद या गोष्टीमुळे लग्न जुळवायला बऱ्याच अडचणी येतात. विशेषतः लोकसंख्या कमी असलेल्या जातींमध्ये!

लग्न जमेपर्यंत सर्वांची मानसिक स्थिती अस्थिर असते. पण ज्यांचं लग्न ठरायचं आहे. त्या मुला व मुलींमध्ये सर्वात जास्त अस्थिरता असते.

लग्न सुंदर असावं, निस्वार्थी  असावं. त्यामध्ये व्यवहारीपणा नसावा. ते दोन कुटुबांचं, संस्कृतींचं मीलन असाव. लग्नात कुणाचीही काहीही मागणी नसावी. फक्त आनंद असावा.

माझे हे पुस्तक म्हणजे या गोष्टी साध्य करण्यासाठी केलेला हा छोटा प्रयत्न.  विशेषतः मुलाकडच्या व्यक्तीना असं सांगावं वाटतं की," लग्न करून सून नाही तर  मुलगी घरी आणा. तरच ती मुलगी असेल. देण्याघेण्याचे, व्यवहार, हुंडा, सोने यांच्या मागण्या करून सुनेला घरात आणलंत, तर ती मुलगीही आईवडील समजून तुमची सेवा करण जरा अवघडच!"

या पुस्तकातून मी माझे काही चांगले वाईट अनुभव सांगणार आहे. माझी इच्छा आहे की ते वाचून कदाचित तुम्हाला ते आपलेच आहेत असे वाटावे.

शिवाय  थोड फार लग्नाच्या विचारसरणीत बदल करायलाही मदत होईल. मुलीच्या

आईवडिलांना मी सागेन, की," मुलीच्या लग्नाचं स्वप्न तुम्ही मुलगी जन्मल्यापासून सजवता. तर ते तितकंच छान साकारु द्या. उगाचच टेन्शन घेऊन तुम्हा दोघांची मनस्थिती बिघडू देऊ नका. लागू दे थोडा वेळ लागला तर! पण एक विसरू नका.......

का उगाच शोधित बससी |

जे आहे तुझे तुझपाशी"........



# पूर्वायुष्य 

इतर मुलींप्रमाणे माझेही लग्नापूर्वीचे आयुष्य चालू होते. छान पैकी, आईवडिलांच्या सुरक्षिततेत, लाडात वाढले. रोजचं ठराविक वेळापत्रक. सकाळी उठणे, अभ्यास करणे, कॉलेजला जाणे, आणि शेवटी प्रथम वर्गात उत्तीर्ण होऊन बाहेरच्या जगात येणे... इथपर्यंत सगळ्याचं आयुष्य सारखं असतं.

इथून पुढे कोणी पुढचं शिक्षण घेतं. कोणी नोकरीच्या शोधात तर कोणी नवरदेवाच्या शोधात लागतं. नवरदेवाच्या शोधाची मोहीम सगळे एकत्रिततपणे पार पडत असतात.

सध्याच्या हम दो हमारे दो( किंवा एक) या प्रथेप्रमाणे आमच्या आई वडिलांना आम्ही दोनच मुलं. मी मोठी मुलगी पर्णवी आणि लहानगा आदित्य. मी पहिलं बाळ म्हणून माझ्यावर संपूर्ण घराचं थोडसं जास्तच प्रेम! विशेषतः आईवडिलांचं!

मुलगी कितीही लाडाची असली तरीही तिला एक दिवस सासरी पाठवावच लागतं.

या गोष्टीच इतर मध्यमवर्गीय आईवडिलांप्रमाणेच माझ्याही आईवडिलाना भान होतं. त्यातूनच त्यांनी शोधमोहीम सुरु केली. २००६ साली,म्हणजे माझ्या कॉलेजच्या शेवटच्या वर्षी! पण या गोष्टीची मला त्यावेळी काहीच कल्पना नव्हती. थोडक्यात हे मला त्यांनी काहीच कळूच दिलं नव्हत. अर्थात हे करण्यामागे त्यांचा उद्देशही चांगला होता. ते आधी स्वतः खात्री करून मग माझ्यापर्यन्त येणार होते. म्हणजे उगाचच माझ्या मनात काही वेगळे विचार नकोत म्हणून.. पण त्यांचा हा उददेश

आता समजतोय. त्यावेळी मात्र मला थोडासा रागच आला होता. (मला न विचारता माझ्यासाठी त्यांनी मुलगा का शोधावा?)



# स्थळ क्रमांक १

हे मला आलेलं सगळ्यात पाहिलं स्थळ. नेहमी लक्षात राहील असं. माझ्या आईवडिलांची मुलांच्या आईवडिलांशी चर्चा वगैरे झाली होती. मुलाचा फोटो आमच्या घरी अगदी मूल्यवान दागिन्याप्रमाणे कपाटाच्या तिजोरीत ठेवण्यात आला होता. त्यानंतर एके दिवशी सकाळी नाश्ता करताना मला विचारण्यात आलं, “तुला लग्नासाठी कुणी मुलगा आवडतो का?” मी सागितलं, “नाही. असा कुणी नाही”.

माझ्याकडून त्यांना ह्याच उत्तराची अपेक्षा होती. त्यांचे चेहरे अगदी प्रफुल्लित झाले.

आणि लगेचच त्यांनी मला “तिजोरीतील मुलाचा फोटो बघ” म्हणून सागितलं. दोन मिनिटं मला काहीच सुचेना! थोडा वेळ स्तब्ध राहून मी लगेच उठले. काहीही प्रतिसाद न देता तिजोरीकडे गेले. तो फोटो हातात घेतला. बघितल्यावर थोडी घाबरले. काळा रंग अगदी कळकटलेला, चेहेऱ्यावर फोड आलेले. आणि त्यावर उठून दिसणारे त्याचे दात! अगदी कोलगेट स्माईल केलेले.. माझी अगदी पहिली आणि लगेचच दिलेली प्रतिक्रिया म्हणजे” **ई**!...”

माझा तो आवाज ऐकल्या ऐकल्या आईबाबांना प्रतिसाद कळला. जेव्हा मी त्यांच्या समोर आले तेव्हा त्यांनी अगदी पक्ष बदलल्याप्रमाणे बोलायला सुरवात केली. “अग आम्हाला आवडला नव्हताच..... सहज त्यांच्याकडून मागणी आली म्हणून विचारावं म्हटलं” वगैरे... आणि तो विषय तेथच संपला! नंतर फक्त त्यांचा “कांदेपोहे कार्यक्रम केव्हा करायचा” असा फोन आल्यावर आईबाबांनी” सध्या एक वर्ष कर्तव्य नाही” असे उत्तर दिले.

**निष्कर्ष** - कृपया प्रत्येक आईवडिलांनी आपल्या मुलाला किंवा मुलीला पूर्वकल्पना

देऊनच पुढचं पाऊल टाकावं.

निवांतीचा काळ

*यानंतर सुमारे एक वर्ष निवांत गेलं. अर्थात त्या काळात मला समजून न देता काही घडामोडी घडल्या असतील तर माहिती नाही. माझी नोकरी अगदी व्यवस्थित चालू होती. आणि पुन्हा एक नवीन स्थळ आलं....*

# स्थळ क्रमांक २

हे स्थळ आलं २००७ साली. छान उच्चशिक्षित घरातील! BE झालेला मुलगा होता. मध्यस्थी होते बाबांनी शोधून काढलेले एक काका (?) त्यांनी मला कधीच पाहिलं नव्हत. त्यांनी बाबांना दिलेल्या माहितीनुसार मुलगा न पाहताच सगळ्याच्या मनात भरला होता.(कौतुकाची अतिशयोक्ती) साधारण एक आठवडा आधीच मुलाकडच्या लोकांचा फोन आला होता की," ते रविवारी येतील" म्हणून!

पूर्वतयारी करणे हे आतिशय चांगले आहे. पण यामुळे संपूर्ण आठवडा माझे आईबाबा मावशा, मामा, फक्त आणि फक्त या स्थळाच्याच विचारामध्ये मग्न होते. त्यांना खायला काय द्यायचे? जेवणच करूयात.. किती चांगलं होईल ना ठरलं तर? मग काय काय द्यावे लागेल, वगैरे....

आणि शेवटी ज्यादिवशी ते येणार. तो रविवार आला. सकाळी १० वाजताची वेळ देऊन ते १२ वाजता आले. पुन्हा आईबाबा आणि मावशी समोर प्रश्न! "आपण तर नाश्त्याची तयारी केली होती. आता १२ वाजता जेवण न करता कसं पाठवाव यांना?" एकंदरीत लोक होते आठ. त्यावेळी मात्र माझा लहान भाऊ ठामपणे बोलला, "फक्त नाश्ताच दया. कारण ऐनवेळी इतक्या लोकांचा स्वयंपाक करणं शक्य नाही. आणि ते लोक उशिरा आले, म्हणून तुमच्यामोर प्रश्न नको. उलट विचार तर त्यांनी करायला हवा होता दोन तास उशिरा येताना!"

माझंही मत तेच होतं. पण मी जास्त काही बोलत नव्हते.( घाबरल्यामुळे आणि दोन तास आधीपासून त्यांची वाट पाहून वैतागल्यामुळे!)

एकंदरीत मुलाचे कुटुंब सुशिक्षित. सगळे डॉक्टर आणि इंजिनियर! मुलगाही इंजिनियर होता. पण ज्यावेळी मी सगळ्यांसमोर जाऊन बसले, तेव्हा त्याने डोके वर करून माझ्याकडे पाहिलेही नाही. माझ्या मनात प्रश्नच प्रश्न....... "नक्की या मुलाला मुलगी बघून लग्न करायचं आहे की नाही? मुलाला बळजबरी करून तर आणल नसेल ना घरच्यांनी? मी इतकी का वाईट दिसते की त्याला बघावंसं वाटत नसेल?"

एकही प्रश्न ना विचारता फक्त पोहे खाऊन तो निघून गेला. त्याच्या घरचे मात्र माझ्याशी मनसोक्त गप्पा मारत होते. जाताना त्याच्या आईने मला आवाज देऊन बोलावून घेतले. छानपैकी वरपासून खालपर्यंत निरखून घेतले. अर्थात सकारात्मक विचाराने ते सगळे परत गेले. त्यानंतर त्या स्थळासंबधात चर्चा आणि वादविवाद चालू झाले. बाबा, आई, मावशी आणि माझा लहान भाऊ हे सगळे त्या चर्चासत्राचे प्रतीभागी! साधारण दोन दिवस हे चालले. त्यानंतर त्यांच्या फोनची वाट पाहिली गेली. त्यांच्याकडून किंवा मध्यस्थाकडून काहीही फोन नाही! शेवटी बाबांनीच त्यांना फोन केला. मध्यस्थाकडून त्यांचे उत्तर आले की, " त्यांना विचार करायला बराच वेळ लागेल. सध्या काही सांगू शकत नाही." त्यानंतर वातावरण थंड! काहीही चर्चा नाही. मी सुटकेचा निश्वास टाकला.

निष्कर्ष: कृपया मुलाची इच्छा असेल तरच मुलाकडच्या मंडळीनी त्याला मुलगी बघायला घेऊन जावं. कारण लग्न त्या मुलाला करायचं असतं! मुलगी पाहून गेल्यावर लगेच काय असेल तो निर्णय कळवावा.



# स्थळ क्रमांक ३

त्यानंतर अगदी एकच महिन्यात माझ्या जवळच्या ताईचा फोन आला. तिने आईकडे माझी कुंडली मागितली. तिच्या जवळच्या नात्यातल्या मुलाला दाखावण्यासाठी! आईनेही मग उत्साहाने दिली. नंतर एक आठवडा काहीच फोन नाही. शेवटी वाट पाहून आईनेच तिला विचारलं, " काय झालं गं?" तेव्हा ताईने सांगितलं की कुंडली जुळवून पाहण्याचं काम चालू आहे. त्यानंतर दोन चार दिवसातच एका संध्याकाळी त्या मुलाचे वडील आणि आजी आमच्याकडे टपकले! काहीही पूर्व कल्पना न देता... त्यावेळी घरात आई आणि भाऊ नव्हते. घरात फक्त मी आणि बाबा. मी अगदी घरातल्या गाऊन मध्ये होते. मी हादरलेच! "असे कसे हे लोक? काहीही ना सांगता आले.".. बाबांनी त्यांना विचारले, " आज अचानक कसे आलात?" त्यांचे उत्तर," काही नाही. अगदी सहज आलो. म्हटलं, भेट घेऊया..." अर्थात मला बघण्यासाठी ते आले होते हे कोणीही ओळखू शकला असता. मी त्यांना चहा करून दिला आणि लगेचच ते गेले. त्यानंतर आम्हाला दुसऱ्या एका नातेवाईकाकडून समजलं की त्या लोकांनी काही लोकांना सांगून टाकलं होतं की "आमचं लग्न ठरलंच आहे" म्हणून! पुन्हा एकदा हादरा!!

मुलगा मुलगी एकमेकांना ना भेटता, घरच्यांना काहीही कल्पना नसताना आईवडिलांना अचानक बाहेरून आपल्याच मुलीचे लग्न ठरल्याच कळावं? मग या गोष्टीचा सोक्ष मोक्ष लावायला माझे बाबा आणि मामा त्यांच्याकडे गेले. अर्थात आधी फोन करून! तर या गोष्टीवर या लोकांचे उत्तर काय असावं? "बघू ना आपण.. ठरलं तर ठरवू.. नाहीतर आमच्या घरात दुसरेही मुलगे आहेत. आम्ही त्यांना सुचवू ना तुमच्या स्थळाबद्दल!"

हे उत्तर ऐकून बाबा आणि मामा चकितच झाले! त्याक्षणीच बाबांनी निर्णय घेतला की, “या लोकांच्या घरातला कोणताच मुलगा नको रे बाबा!”

**निष्कर्ष:** मुलाकडील मंडळीनी अचानक कुणाच्याही घरी जाऊन काहीही चुकीचं पसरवू नये. लग्न ठरल्याशिवाय त्याबद्दल इतरांना सांगू नये. व्यवस्थित निर्णय घ्यावा आणि मगच मुलीकडच्या लोकाना त्रास द्यावा.!



# स्थळ क्रमांक ४

त्याच वर्षात (२००७) थोड्याच काही महिन्यामध्ये माझ्या मामाला एक स्थळ सुचलं. मुलगा आमच्या गावाकडचा होता. पण पुण्यात नोकरीसाठी स्थिरावलेला. झालं! पुन्हा एकदा चर्चा सुरु. आमच गाव अमरावती!

सुमारे १२ तासांचा प्रवास. इतक्या लांबून मुलाकडच्या मंडळीना घेऊन येण्याची जबाबदारी मामाने उचलली. बिचारा मुलीचा मामा स्वतःची गाडी घेऊन, जेवणापासून सगळा खर्च करत त्या सगळ्या लोकांना घेऊन आला. मुलाचे आईवडील, आजोबा आणि माझा मामा सगळ्यांचं सकाळी ५ वाजता आमच्या घरी आगमन झालं.

ते येणार म्हणून आई, बाबा,मी,माझा भाऊ सकाळी ३.३० वाजताच उठून तयार होऊन बसलो. अर्थात घर आवरून, अंघोळी वगैरे करून! ते लोक आल्या आल्या इतके दमले होते की चहा पिऊन चक्क झोपून गेले!!.

माझं इतकं डोकं फिरलं. मी विचारच करत बसले. असं आपण कुणाकडे प्रथमच जातो तेव्हा आपण गेल्या गेल्या झोपतो का? असो. दमले असतील बिचारे.........

आईने मला “कामातून सुट्टी काढ” असे सागितले. पण मी साफ नकार दिला. कारण मुलाने त्याचे आई वडील पुण्यात येऊनही सुट्टी काढून येण्याची तसदी नव्हती घेतली! त्याला मात्र ऑफिस मध्ये काम होते. आईला ते पटलं आणि तिने मला जावू दिलं. “सुटले बाबा”!.....

संध्याकाळी मी घरी आले. मुलगा येणार होता. सकाळचं जेवण तर करून झालंच होतं सगळ्या मंडळींचं! पण संध्याकाळीही मुलासकट सगळे पुन्हा जेवून मग आमचा निरोप घेणार होते.

मी आणि आई दोघीच काम करणाऱ्या बायका घरात. मी आईला स्वयंपाकाला मदत करत होते. मुलाची आई छान आमच्या स्वयंपाकघरात खुर्चीवर बसून निरीक्षण करत होती आमच्या कामाचं! विशेषतः माझ्या!!

संध्याकाळी येणारा मुलगा रात्री आला. जेवणाच्या वेळी बरोबर आला!.
आमचा बघाबघीचा कार्यक्रम झाला. मुलाने एकाही प्रश्न न विचारता फक्त माझ्याकडे पहिले. त्याच्या आईने मात्र भरपूर प्रश्न विचारले.

आई : "स्वयंपाक येतो का?"
मी : "हो येतो."( मनातल्या मनात, "आता स्वयंपाक घरात बसून काय बघत होती मग.?")
आई: "नोकरी करायची आहे का लग्नानंतर"?
मी : "हो करायची आहे."
आई: "माझा मुलगा बाहेरदेशी गेला तर जाशील का?"
मी : "हो काही हरकत नाही."

असे सर्व साधारण दहा एक प्रश्न विचारले गेले. नंतर जेवण्याचा कार्यक्रम झाला. मुलाला मी जेवण वाढताना निरखून पाहिलं. एकदम काळवंडलेला कुळकुळीत.. उंचीला कदाचित माझ्या इतका. आणि त्या काळ्या रंगावर भडक निळ्या रंगाचा शर्ट परिधान केलेला! पुन्हा एकदा स्थळ क्र १ ची आठवण झाली. आणि तीच प्रतिक्रिया आली.

जेवणानंतर मात्र मंडळी मुलाच्या घरी झोपायला गेली. माझा मामा आणि मी आम्ही सगळे नेहमीप्रमाणे चर्चासत्रात सहभागी होऊन आपले विचार सांगत बसलो.

इतकं सगळं झाल्यावर रात्री ११ वाजता त्या मंडळींचा फोन आला. मामाला त्यांनी सांगितलं," सकाळी ५ वाजता पुण्यातून निघू. परत जायला आणि आम्हाला घ्यायला गाडी इकडे पाठवून दे." मुलीच्या चांगल्या मामाप्रमाणे त्याने त्यांना "जशी आपली इच्छा " म्हणून गाडी पाठवण्याची पूर्वतयारी करून ठेवली. बाकी सगळे सकारात्मक दृष्टीने त्यांच्याकडे बघत होते. पण माझ्या मनात मात्र संताप संताप............!!!

मुलगी बघतात म्हणजे नक्की काय करतात? तिच्या प्रत्येक गोष्टी कृती निरखून बघायच्या, आणि पुन्हा तेच प्रश्न विचारायचे? तिच्या घरच्यांना सरळ ऑर्डरी सोडायच्या? हा प्रकार कुठेतरी बदलायला हवा.



# स्थळ क्रमांक ५

थोडा काळ जरा विश्रांतीचा गेला. साधारण ५-६ महिने! त्यानंतर पुन्हा आईबाबांच्या प्रयत्नांना कुठेतरी यश यायला लागल. अचानक एक फोन आला. अगदी आमच्या घरापासून १५ मिनिटाच्या अंतरावर त्याचं घर होतं.

इतक्या जवळ स्थळ असून आपल्याला माहिती नाही याचं आईबाबांना आश्चर्य वाटलं.. असो.

पुन्हा एकदा रविवारचा दिवस ठरला. अगदी ठरलेल्या वेळेत आवश्यक तितकेच लोक आमच्याकडे आले. आमच्याकडे एक विशेष गोष्ट घडायची दरवेळी. ती म्हणजे पाहुणे आले रे आले की लगेचच माझी आई आणि भाऊ आत येऊन मुलगा कसा आहे ते सांगायचे.

यावेळी त्यांना मुलगा फार आवडला होता. तो सुंदरच होता. (handsome नव्हे!)

चांगला गोरागोमटा, उंच, नाजूक, सरळ नाकाचा वगैरे.. आम्हाला दोघांना बोलण्यासाठी एका वेगळ्या खोलीत जायला सांगण्यात आले. त्याने मला फक्त एकच  प्रश्न विचारला.

तो: “तुझी काय अपेक्षा आहे होणार असलेल्या नवऱ्याकडून?”

मी: “ काही नाही. चांगला मनमिळावू असावा.” आता प्रश्न विचारण्याची माझी वेळ. म्हणून मी लगेचच त्याला विचारले,..

मी:”तुला कशी बायको हवी आहे रे?”

तो: “व्यवस्थित, घर आणि आईवडिलांना सांभाळणारी!”

मी: “ आणि तुझं काय?”

तो: तसं काही नाही. मी सगळ्यांशी जमवून घेऊ शकतो. मला स्वत:साठी नाही तर घरासाठी चांगली बायको हवी आहे.”

त्याचं हे उत्तर ऐकून मी कोड्यात पडले. म्हणजे नक्की काय? यावर काय ठरवावं? तो कोणाबरोबरही जुळवून घेऊ शकतो म्हणून तो चांगला म्हणायचं की त्याला स्वत:साठी नको तर घरासाठी बायको हवी म्हणून त्याला वाईट ठरवायचं?

तो बायकोच्या भूमिकेपेक्षा सुनेच्या भूमिकेला जास्त महत्त्व देतो की काय?

मी पूर्ण गोंधळून गेले. पण दोन दिवसांनी ठरवलं की आपण आता विचार करायचा नाही. जे होईल ते पाहू!

त्यांचा फोन आला नव्हताच! मग बाबांनी एक आठवड्याने फोन केला. आम्ही नको नको म्हणता असताना! त्यांची प्रतिक्रिया मला आधीच माहिती असल्याने मला फार काही  वाईट वाटलं नाही.

**निष्कर्ष**: आपण दुसऱ्याच्या जागी जाऊन विचार केला तर आशाभंग होत नाही आणि समोरच्याच्या  मनातलं आधीच समजून जातं!



# स्थळ क्रमांक ६

आता २००८ या नवीन वर्षाची सुरवात झाली होती.पुन्हा नव्या उमेदीने उत्साहाने संपूर्ण कुटुंब विशेषतः आई, बाबा, मावशी स्थळ शोधू लागले. आता तर आमच्या घरातले सगळे प्रत्येक लग्नाला जाऊ लागले. चुकून कोणी हिरा सापडला तर......

या वर्षात मला २-३ स्थळे आली. एक माझ्या भावाने सकाळी मॉर्निंग वॉकला जाताना शोधून काढला. शक्यतो मॉर्निंग वॉकला जाऊन लोक फुल व्यायाम करतात. पण आमच्या घरातले तेव्हाही मुलाचा शोध घेत होते. तो इतका लहान असून स्थळ शोधू शकतो यांवर माझा विश्वास नाही बसला. पण हे सत्य होतं. कदाचित त्यालाही जबाबदारीची जाणीव झालेली असावी. त्याने नंबर, माहिती सगळं काही आणलं. मग बाबांनी त्यांना फोन केला.

मुलाकडच्या लोकांनी बाबांनाच घरी येण्याची विनंती केली. मग बाबा माझी पत्रिका व फोटो घेऊन त्यांच्याकडे गेले. मुलगाही भेटला. बाबांना आणि माझ्या भावाला मुलगा आवडला. आमच्या दोघांची पत्रिका आम्ही जुळवून पहिली. ती जुळत होती. मग मुलाच्या घरी फोन केला गेला. त्याचं उत्तर म्हणजे “आमचा वेगळा ब्राम्हण आहे. आम्ही त्यालाच पत्रिका दाखवत असतो. तो सध्या पुण्यात नाहीये तर आम्ही एक आठवड्याने कळवितो.” खरंच एक आठवडा झाल्यानंतर

त्यांचा फोन आला. ते आमच्या घराजवळ आले होते. आणि १० मिनिटामध्ये घरी पोहचणार होते. पुन्हा एकदा बाबा आणि मीच घरात.

बाबांना कहीच सुचेना. शेवटी शेजाऱ्यांच्या वहिनींना मदतीला बोलावलं. त्यांनी मला साडी नेसवून दिली. मग मी उपीट केल. तोपर्यंत ते लोक आले होते.

इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर मुलाचे आई वडील मूळ मुद्यावर आले. त्यांनी बाबांना सागितलं की," आमच्या ब्राम्हणा प्रमाणे पत्रिका जुळत नाही. तेव्हा आम्ही पुढे नाही जाऊ शकत." असं डोकं फिरलं बाबांचं आणि माझं!.......

इतकंच सांगायचं होतं तर ह्या लोकांना घरी येण्यची काय गरज होती? ते फोन करूनही सांगू शकत होते. आणि जर त्यांना सहज ओळख करायला किंवा भेटायला यायचं होतं तर त्यांनी पूर्वकल्पना देऊन यायचं होतं. असो! ज्याची त्यांची पद्धत!

**निष्कर्ष** - मुलाकडच्या मंडळींनी पूर्वकल्पना देऊनच मुलीच्या घरी जावे. आणि मुलीकडच्या मंडळींनीही उगाचच ते लोक येतात म्हणून गडबड करून तयारी करू नये. आपण आहोत तसे आहोत. जसे आहोत तसे बघा!



# स्थळ क्रमांक ७

याच वर्षी २-३ महिन्यांनी पुन्हा एक नवीन स्थळ आईबाबांना समजलं. त्या स्थळाच्या कडील लग्नास जाण्याचा उपयोग झाला होता. मी यावेळी “बी फार्म” होते. आणि या स्थळ चा मुलगा “एम फार्म”! त्यामुळे सगळ्यांना शैक्षणिक दृष्ट्या खूप आवडला.. शिवाय तो पुण्यातच नोकरीला होता. एकुलता एक.

दिवाळीचे दिवस होते. या वर्षी आमच्याकडे दिवाळी करायची म्हणून सगळेच नातेवाईक अमरावतीहून पुण्यला आले होते. झालं मग काय सगळ्यानाच उत्साह! सगळेच मोकळे होते. स्थळ समजल्या समजल्या दुसऱ्या दिवशी त्याला पहायला सगळे निघाले. एकूण ९ लोक आणि मुलगा मात्र एकटाच........ बिचारा! ......

त्याचे आईवडील गावाकडे होते. त्यांनी परवानगी दिल्यावरच आमचे घरचे त्यांचा मुलगा पहायला गेले. मुलाला ते एका हॉटेलमध्ये भेटले. मुलगा सगळ्यांनाच आवडला. त्याला जेव्हा माझ्या बाबांनी विचारल, “तुम्हाला या वर्षी लग्न करायचं आहे ना?” त्यावर त्याच उत्तर म्हणजे,” माझा अजून २ वर्षे लग्न करण्यचा विचार नाही.” ते उत्तर एकून सगळे नाराज........

मला मात्र प्रश्न पडला,जर याला लग्नच नाही करायचं २ वर्षे, तर त्याच्या घरचे आतापासून मुली का पाहतात? आणि हा का भेटतोय मुलीकडच्या लोकांना?.

त्यानंतर माझ्या वडिलांनी त्याच्या घरी फोन केला. लग्नाबद्दल विचारले आणि कधी येतोय मुलगी बघायला हे सुद्धा विचारले. त्याचे आईवडील आणि मामा एक आठवड्याने मला बघायला आले. ते येणार त्याच्या आदल्या दिवशी माझ्या

मामांनी त्या मुलाला विचारलं,"तुलाही मुलगी बघायला यायला आवडेल का? आमची अशी इच्छा आहे की तुम्ही यावं. कारण लग्न तुम्हा दोघांना करायचं आहे. तेव्हा तुम्ही एकमेकांना भेटलात तर जास्तच चांगलं". त्याने " प्रयत्न करतो." असे उत्तर दिले. शेवटी तो नाहीच आला, कारण त्याला म्हणे ऑफिसमध्ये काम होते. मी मात्र अर्धा दिवस रजा काढून घरीच थांबले. मला ऑफिसमध्ये महत्वाचे काम असून सुद्धा! त्याच्या  घरचे आले. जेवण केलं. निघून गेले. त्यानंतर काही फोन नाही. काही संपर्क नाही. आमच्या घरातील मंडळी पुन्हा उदास........

**निष्कर्ष :** मुलीला जेवढी मनापासून इच्छा असते तेवढी मुलाला सुद्धा असायला हवी. तरच वेळ घालवण्यात अर्थ!

या नंतर माझ्या घरच्यांना इंटरनेटच्या सोई सुविधा बद्दल समजलं. इंटरनेटवर असलेल्या मराठी स्थळे असलेल्या संकेत स्थळावर माहिती टाकावी असे त्यांनी सुचवले. माझी काही इच्छा नव्हती. कारण त्यासाठी पैसे जाणार होते. पण मग मला समजल की पैसे न भरता आपण फक्त नावे पाहू शकतो आणि माहिती घेऊ शकतो.

मी  आईबाबांबरोबर बसून सुमारे २०,२५ मुलांची माहिती मिळवली. त्यांना विनंती पाठवली. बऱ्याच मुलांकडून सकारात्मक उत्तरे आली. त्यातील २,३ मुले फेस बुकवर माझ्याशी संपर्क साधून घरी बघायला  आली.



# स्थळ क्रमांक ८

पुन्हा एक “आगाऊपण” सिद्ध करणारं स्थळ आलं. हे होतं मुंबईचं. त्या लोकांनी असे सागितले की,” मुलगी बघायला आम्ही सगळे येत आहोत.”

सगळे म्हणजे मुलाचे आईवडील, मुलगा, मुलाच्या ३ बहिणी आणि त्यांची मुले. आता आम्ही सगळे इतक्या लोकांच्या तयारीला लागलो. वेळेवर मात्र चारच लोक आले. मुलाची आई आणि तीन बहिणी. मुलाची आई कोण्या एका राजकीय पक्षाची अध्यक्ष होती. बहिणी लग्न झालेल्या होत्या.

“मुलगा का नाही आला” माझ्या घरच्यांनी त्यांना विचारले. त्याचं उत्तर “त्याला खूप काम आहे त्याचा फोटो आणायलाही आम्ही विसरलो. आम्हीच मुलगी पाहणार आहोत” मला खूप राग आला होता. पण मी मनात म्हटले की जाऊ दे. भेटून तर घेऊ सगळ्यांना. मग झालं काय तर त्या चार बायकांनी मिळून प्रश्नावली चालू केली.

मुलाची आई: “तुला स्वयंपाक करायला आवडतो का”?

मी: “ हो “

बहीण: “तुला लग्नानंतर नोकरी करायचीच आहे का “?

मी: “हो करायचीच आहे.”

दुसरी बहीण : “पण आमच्याकडे नोकरीची काही गरज नाही. आमचं खूप मोठं घर आहे. आमचा छान बिझनेस आहे.”

मी: “मी पैशासाठी नाही तर स्वःतासाठी नोकरी करते. माझ्या शिक्षणाचा कौशल्याच्या उपयोग व्हावा म्हणून.”

तिसरी बहीण : “अगं पण आमच्या आईला सारख्या सभा वगैरे असतात. त्यामुळे ती फिरतीवर असते. आणि त्यात तूही नोकरी केलीस तर घर कोण सांभाळणार.”?

मी: “ मी घर सांभाळून नोकरी करू शकते.”

आता माझा पेशन्स संपत चालला होता. आणि पुन्हा त्यात मुलाच्या आईची भर!! मुलाची आई : आमच्या “यांना” बरं नसतं. सारखी औषधं, पथ्यं चालू असतात. घरी सारखे येणारे जाणारे लोकही चालू असतात. ते सगळं कोण सांभाळणार.

मी : खूप काही बोलणार होते पण स्वतःवर संयम ठेऊन शांत बसले.

मनातल्या मनात म्हणाले, “निघा आता माझ्या घरातून.”

त्यांचं खाणपिण झाल्यावर ते निघून गेले. आमच्याकडे सर्वांनाच त्यांचा खूप राग आला होता. त्यामुळे कोणीच काहीच न बोलता त्यांचा विषय डोक्यातून काढून टाकला. झाले! हे ही वर्ष संपल. आणि माझ लग्न नाहीच जुळलं.



# स्थळ क्रमांक ९

वर्ष २००९! या वर्षी मला “एम फार्म” ला अडमिशन मिळाली. असं वाटलं की, आता दोन वर्ष निवांत! पण तसं झालं नाही. शोध मोहीम, फोनाफोनी चालूच होती. या परिस्थितीत तर मला अचानक कधीही फोन आला की भोर वरून पुण्याला यावं लागायचं. कारण माझं कॉलेज भोरला होतं. असाच एकदा matrimony वरून पाहिलेल्या एका स्थळाचा फोन आला. ते जळगावहून येणार होते.

मुलाला आई नव्हती. आम्ही दोघांनी एकमेकांचा प्रोफाईल आधीच पहिला होता. फोटोही बघून झालेले होते.

मी भोरहून पुण्याला पोहोचले. ते लोक दिलेल्या वेळेत आले. मुलगा वर मान करून बोलतच नव्हता. त्याच्या वडिलांनी मला नेहमीप्रमाणे सर्व साधारण प्रश्न विचारले. मी समोर बसले असूनही त्यांनी माझा फोटो बघायला मागितला. मुलाचं शिक्षण चांगलं होतं. नोकरीही चांगली होती.

मला ५-१० मिनिट बसून आत जाण्यास सागितलं. मी आतमध्ये गेल्यावर मात्र मुलाने वर मान केली. आणि माझा भाऊ त्याला  प्रश्न विचारू लागला. त्यावेळी त्याने पाहिले की मुलगा चकणा होता. झालं!!

तिथेच पूर्ण विराम!


त्यावरचं प्रकरण म्हणजे मुलाचे वडील माझ्या वडिलांना माझा फोटो पाहून विचारतात, “मुलीच्या डोळ्यामध्ये थोडा प्रोब्लेम आहे का? तिच्या गालावर काही

डाग वाटतात का?” बाबा खूप चिडले. तरीही संयम ठेवत त्यांनी उत्तर दिले की “असं काही नाही, माझ्या मुलीत काहीच दोष नाहीत.” त्यांचा पाहुणचार झाल्यावर पाहुणे गेले.

पुन्हा दोन दिवसांनी त्यांचा फोन आला. “आम्हाला मुलगी पसंत आहे. तुम्ही आता आमच्या घरी या.”

बाबांनी “आमचा नकार आहे” इतकेच सांगून फोन खाली ठेवून दिला.

**निष्कर्ष:** शक्यतो मुलाला घेऊन स्थळ बघायला जावं. आणि मुलाने जास्तीत जास्त संवाद साधावा. कारण आयुष्य त्या दोघांना एकत्रित घालवायच असतं.



# स्थळ क्रमांक १०

यावर्षी एकदम पुष्कळ स्थळांकडून फोन वगैरे आले. सुमारे ५-६ स्थळे आली. पण प्रत्येक ठिकाणी शिक्षण, वय, राहणीमान यांचा अडथळा होता.

पुण्यातलाच अनिमेशनचा कोर्स झालेला मुलगा होता. कुणीतरी नातेवाइकांकडून त्याचं स्थळ समजलं होतं. आईबाबा त्यांच्याकडे जाऊन आले होते. आता ते आमच्याकडे आले. त्याची आई आणि तो आले. नेहमी प्रमाणे चहा-पोहे कार्यक्रम झाला.

त्याच्या आईने व्यवस्थितपणे प्रश्न विचारले. त्यांच्याकडे पाहून ते खरंच चांगल्या विचारांचे वाटत होते. पण आश्चर्य म्हणजे मुलाने मला एकही प्रश्न विचारला नाही. आमच्या घरून जाताना त्याने फक्त बाबांना विचारले की, “ मला मुली बरोबर जास्त बोलता आलं नाही. पण माझी बोलायची इच्छा आहे. तेव्हा मी बोलू का तिच्याशी फोन करून?” बाबा म्हणले,”काहीच हरकत नाही “.

साधारण दोन दिवसांनी त्याचा फोन आला. बोलण्यावरून तर तो व्यवस्थित वाटत होता.

तो : “sorry, पण त्या दिवशी मी बोलू शकलो नाही. थोड गोंधळल्यासारखं झालं.”

मी : “its ok. मी समजू शकते. काही हरकत नाही. तुम्हाला काही विचारायचे असेल तर विचारा.”

तो : “मी ना खूप मुडी मुलगा आहे. एक कलाकार आहे. बसलो एकदा रूम मध्ये जाऊन की बाहेरच येत नाही. कोणीही किती आवाज देऊ देत.

मी माझ्याच कामात दंग असतो. मग मला काहीच शुध्द राहत नाही. मी भानावरच नसतो.”

मी :- ( जरा घाबरून ) “बरं कदाचित कलाकार असेच असतील.”

तो :- ( जरा भानावर येऊन ) पण मी एकदा खोली बाहेर आलो, की खूप मजा करतो. पूर्ण पणे कुटुंबाचा असतो.

मी :- ok चांगली गोष्ट ( मनात हसून, “नशीब रे बाबा तू खोलीबाहेर येतो”.)

तो :-माझा बाहेरदेशी जाण्याचा विचार आहे. त्यसाठी मला एक modern मुलगी हवी आहे. तिकडे राहू शकेल अशी.

मी:- ( जरा गोंधळून) म्हणजे रहाण्यात modern की विचारात? नक्की कशी?

तो:- “तिचा लूक modern असावा. अगदी तिकडच्या मुली राहतात तसा”

मी:- “ok. पण मी मिनी घालून स्वतःला comfortable नाही समजू शकत.

माझं राहणीमान साधंच आहे. पण विचार modern आहेत.”

तो: “पण हे सगळं परदेशात शोभायला हवं ना?”

मी:- (थोडी चिडून पण शांततेने ) “अहो तुमची आणि माझी विचारसरणी बरीच वेगळी आहे. माझा भर विचारांनी सुधारण्याचा आहे. तुमचा भर राहणीमानावर आहे. तुम्ही परदेशी जायचा अजून विचारच करताय. मी आधी दोन वेळेला परदेशी जाऊन आले आहे. मी परदेशात जाते, तेव्हा माझी भारतीय साडी नेसून माझी

संकृती दाखवते. तुम्ही मात्र परदेशात जायचं म्हणून बायकोला इकडेच मिनी घालायला लावणार!"

तो: "हो खर आहे. आपली विचारसरणी वेगळी आहे."

मी: "मग काय करूया?"

तो: "मला वाटत आपण पुढे नको जायला."

मी:- "ठीक आहे.मग मी घरी सांगते"

तो:- ok

मी:"ok bye all the best. तुम्हाला लवकरच भारतात अमेरिकन राहणीमानाची मुलगी मिळो."

असा हा अध्याय समाप्त.

**निष्कर्ष:** उगाचच वेळ वाया घालावण्या पेक्षा लवकर उत्तरावर पोहोचलेलं बरं. आणि विचार जुळले की कोणत्याही परिस्थितीत जुळवायला बरं असतं.



# स्थळ क्रमांक ११

वर्ष २०१०!

चाळीसगावहून एका गृहस्थाचा फोन आला. ते मध्यस्थी होते. एक डॉक्टर मुलगा होता. पण वयाने चक्क तीन वर्षांनी लहान. बाबांनी नको म्हणून सांगितलं तरीही त्यांनी आग्रह केला, आणि बाहेर एका मंदिरात भेटायला बोलवलं. माझी अजिबात इच्छा नसतानाही मी गेले. कारण हे सगळं, 'एका लग्नात त्याचे आईवडील बाबांना भेटले आणि खूप आग्रह करू लागले' यामुळे घडलं.

त्याच्या आईवडिलांनी सरळ आम्हा दोघांनाच बोलायला सांगितलं. पण मी आश्चर्यचकित झाले. हे लोक एकुलत्या एक डॉक्टर मुलाला ३ वर्षांनी मोठी मुलगी कशी पाहू शकतात? नंतर आमच संभाषण चालू झालं.

मी: " तुम्ही स्वतःपेक्षा मोठ्या मुलीसोबत कसं manage करणार?".

तो: "मला नाही वाटत लग्नाचा आणि वयाचा काही संबंध आहे!"

मी: "तरीही जरा प्रवाहाच्या विरुद्ध पोहोल्यासारख नाही का वाटत?"

तो:- "हो वाटत ना, पण त्यातही एक मज्जा असते. विचार जुळणं जास्त महत्वाचं. वयापेक्षाही."

मी: (थोडस पटलंय असं दाखवून )" कदाचित बरोबर असेल तुमचं."

तो: "तुम्ही चाळीसगावात काय करणार करियर बद्दल?"

मी:- "कदाचित कॉलेजवर लागू शकेन प्राध्यापक म्हणून!"

तो: "ok. तुम्हाला काही विचारायचं आहे का?"

मी- नाही. (डोक्यात विचारांचा गोंधळ इतका झाला होता की काही विचारण्याची इच्छाच नव्हती.)

आम्ही तेथून निघून गेलो.

**निष्कर्ष:** खरच विचार जुळण महत्वाचं तर असतंच पण त्या बरोबर सामाजिक बांधिलकी आणि जबाबदारीही हवी.



# स्थळ क्रमांक १२

यावेळी माझ्या मावशीने एक स्थळ शोधलं. मुलगा आमच्या गावाकडचा होता. पण पुण्यात नोकरी करत होता. सगळे निर्णय तोच घेणार होता. त्याच्या आईवडिलांनी त्याला “मुलगी आवडली की आम्हाला बोलाव” असं सांगितलं होतं. तो खूप उत्साही वाटला. फोनवर बोलून एका रविवारी तो आमच्या घरी आला.

उंच गोरा गोमटा राजबिंडा असा काहीसा तो दिसत होता. थोडक्यात बघताच क्षणी प्रसन्न छान वाटावं असं त्याचं व्यक्तिमत्व होतं.

त्याचे विचारही चांगले होते. आणि स्पष्टवक्ताही वाटला. त्याने सरळ सगळ्यांसमोर समोरच सांगितलं, “माझ्या होणाऱ्या बायकोकडून माझ्या काहीच अपेक्षा नाही.. तिने मला जेवण वाढावं, माझे कपडे धुवावे, माझं घर स्वच्छ करावं असं काहीच नाही. संसार हा दोघांचा असतो. तेव्हा दोघांनी मिळून घरातले सर्व काम करावे. कारण नोकरी तर दोघही करतात ना?”

ऐकून फार छान वाटलं. त्याने तर हेही सांगितले की स्वयंपाक सुद्धा मी करून ठेवीन. जर तिला कधी कंटाळा आला किंवा तिची इच्छा असेल तर रोजच. काही मुलीना नाही आवडत स्वयंपाक करायला. हे ऐकून तर मी आणखीच आनंदी झाले. इतक्या सुधारित विचारांची मुलं टीव्ही सिरीयल मध्येच बघायला मिळतात.

सगळी प्रस्तावना करून झाल्यवर मात्र गाडी वेगळ्या रस्त्यावर वळण घेऊ लागली. त्याने प्रामाणिकपणे काही गोष्टी सांगितल्या. त्या थक्क करणाऱ्या होत्या. त्याला अध्यात्माची खूप आवडत होती. इतकी की तो स्वतःमध्ये रममाण होत असे. स्वामी समर्थाचा तो विशेष भक्त होता. त्यांची भक्ती मी ही करते. पण या

मुलाचे विचारच वेगळे होते. त्याचा कल ब्रम्हचारी राहणे, संन्यास घेणे. या गोष्टीकडे होता. मला प्रश्न पडला हा मुलगा लग्नाची तयारी का करतोय? आपल्या बायकोसोबत कसं वागावं हे का ठरवतोय? याला नक्की लग्न करायचं कि ब्रम्हचारी राहायचं? जितक्या उत्सुकतेने तो लग्नाबद्दल बोलला तितक्याच उत्सुकतेने ब्रह्मचर्याबद्दलही बोलला. जाताना तर त्याने धक्काच दिला आम्हा सर्वांना. त्याची काही वाक्ये

म्हणजे " मै शादी करुंगा कि नही पत्ता नही, शादी करके निभाउंगा या नही ये भी पत्ता नाही.|" लेकीन मेरी एक बात  याद रखो | जो होगा अच्छा होगा |.मेरी मनसे इच्छा है आपकी लाडकी को बहोत अच्छा ससुराल मिले|. जो भी मिलेगा बहोत अच्छा होगा. आप बहोत अच्छे लोग है.|"

मला असं वाटल साक्षात साष्टांग नमस्कार घालून त्याचा आशीर्वाद मागावा. कुणी साधुसंत अवतरले आहेत आपल्या घरी. तो गेल्यावर आम्ही खूप हसलो.त्याचे आभारही मानले की त्याने सगळं आधीच स्पष्ट केलं.

**निष्कर्ष:** लोकांची चांगल्या भावना ओळखून त्यांना समजून घेतलाच तर कुणालाच वाईट वाटत नाही.



# स्थळ क्रमांक १३ व १४

यावर्षी आमच्याकडे दोन गावाकडचे आले. एक मुलगा होता जवळजवळ सात डिग्री मिळवलेला. सध्या त्याची पी.एच.डी. चालू होती. त्याच्या घरचे ठरवलेल्या दिवशी मला पाहायला आले. सर्व काही पूर्व नियोजित होतं. यावेळी आमच्या आईच्या बारीक निरीक्षणाची प्रचीती आली. तो मुलगा घरी आला. त्याने तोंड, हात, पाय धुतले.

आमच्या बाथरूम मध्ये दोन napkin लावले होते. एक स्वच्छ पांढरा, एक चॉकलेटी रंगाचा. त्याने चिखलाचे धुतलेले पाय पुसायला पांढरा स्वच्छ नापकिन वापरला. ते माझा आईने पहिले. तिथेच तिने मुलगा नाकारला. विशेष म्हणजे त्याला २८ व्या वर्षानंतरही नोकरी न करता अजून शिकतच रहावं असं वाटत होतं. झालं. त्या स्थळाचा अध्याय संपला.

आता दुसरा मुलगा इंजिनियर! पुण्यातला. आईबाबा त्याला भेटले होते. त्यांना तो बरा वाटला होता. पण विदर्भातील प्रथेप्रमाणे मुलाने आधीच मुलीला भेटू नये. आधी मुलाकडचे मुलीला भेटतील. आणि त्यांना आवड्ली तर तर ते मुलाला घेऊन जातील. अर्थात सगळेच असे नसतात. पण मला भेटलेले २,३ असेच होते. त्या मुलाचे भाऊ,वाहिनी येऊन भेटले. आणि नंतर त्यांनी हा विचार केला की पुण्याची मुलगी असल्यामुळे ती आमच्या मुलाला गावाकडे येऊ देणार नाही. बहुतेक लोकांचा असा गैरसमज असतो. पण असं काही नसतं.

**निष्कर्ष:** उगाचच काहीतरी चुकीचा ग्रह करू नये. कुणाहीबद्दल करू नये.! कित्येक उदाहरणं आपल्या मनोग्रहाच्या विरुद्धही भेटू शकतात. समाजात पाहिले तर दिसू शकतात.

# स्थळ क्रमांक १५

याच वर्षी एक अतिउत्साही कार्यकर्ता आमच्याकडे आला. मुंबईचा बोलबच्चन!. मुलगा खूप चांगला होता. पण त्याचे वडील " भयानक". त्यांनी मला विचारले काही प्रश्न.

त्याचे वडील:- "नोकरी करायची आहे का लग्नानंतर?"

मी:- हो.

वडील:- करायची की करायचीच?

मी:- करायचीच आहे.

वडील:-किती तासांची करणार?

मी:- नेहमीप्रमाणे ८ तास. सगळे करतात तशीच.

वडील:- आम्ही आजारी असलो तरी नोकरीवर जाशील का?

मी:- तुमच्या आजारपणावर ते ठरेल. जास्तच असेल तर नाही जाणार.

वडील:- आम्ही सांगू तेव्हा सुट्टी काढावी लागेल.

मी:- ते नोकरीवर ठरेल. आणि तो निर्णय मी घेईन. जर मला शक्य असेल आणि खरंच घरात माझी गरज असेल तर मी नक्कीच सुट्टी काढीन. मलाही सून व बायको म्हणून माझ्या काय जबाबदाऱ्या आहेत या समजतात.

यापुढे त्याच्या वडिलांशी बोलायची माझी इच्छाच नव्हती. कदाचित माझ्या चेहेऱ्यावरचा राग मुलाच्या लक्षात आला. त्याने लगेचच पुढाकार घेऊन सांगितलं

“आता प्रश्न बास झाले. मला मुलीसोबत बोलायचं आहे.”

नंतर आम्ही दोघं बोलू लागलो.

मुलगा:-तुला राग आला का माझ्या वडिलांचा?

मी:-नाही. कदाचित त्यांच्या अपेक्षेत मी बसणार नाही असं मला वाटत.

मुलगा:- नाही गं. त्यांच्याकडे लक्ष देऊ नकोस. माझी आई खूप चांगली आहे. ती माझी जणू मैत्रिण आहे आम्ही दोघं तुला काहीही त्रास होऊ देणार नाही.

मी:- ठीक आहे.

मुलगा:- मला तू आवडलीस. तुला मी आवड्लो का?

मी:- लगेच नाही सांगू शकत. थोडा वेळ लागेल विचार करायला.

मुलगा:- किती वेळ लागेल.

मी:- नाही सांगता येणार बहुतेक २,३ दिवस. प्रश्न लग्नाचा आहे. एकदा ठरवलं की मागे फिरता येणार नाही. त्यामुळे विचार करून निर्णय घेतलेला बरा.

मुलगा:- हो नक्कीच. पण एक सांगतो, मी जेव्हा आजारी पडलो तेव्हा माझ्याजवळ कुणीच नव्हतं. मी U.S.A ला होतो. आणि त्याच क्षणी मला वाटलं आपल्याला बायको असावी. म्हणून मला आता लग्न करायचं.

मी:- (जरा हसून ) o k.

हे लोक गेल्यावर आमच्या घरात अगदी ताणतणाव. प्रत्येकाचे मत वेगवेगळे. कुणी म्हणे मुलगा चांगला आहे. बरं झालं तर कुणी म्हणे पूर्ण घरच चांगला हवं. उद्या सासऱ्यामुळे यांच्यात वाद झाला तर? मुख्य प्रश्न खाण्याचाही होता. त्यांच्या घरी कधीतरी शाकाहारी जेवण होत असे. इतर वेळी त्यांना मांसाहारच लागे. त्यामुळे त्या मुलाला होकार देण्याची मनात कुठेतरी भीती वाटत होती. कारण मी पूर्ण शाकाहारी. शेवटी मी खूप विचार करून नकार कळवून दिला. अर्थात नकार देण्याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे त्या मुलाचे वडील होते.

**निष्कर्ष** : स्पष्टवक्तेपणा कधीही चांगला. पण समोरच्याला प्रश्न विचारताना आपुलकीने विचारावे.



# स्थळ क्रमांक १६

वर्षाचा शेवट जवळ येत होता. आई,बाबा, मामा, मावशी वा अन्य नातेवाईक.. कोणाच्याच हाती अजून एकही स्थळ लागलं नव्हतं. हे सगळे लोक भरपूर तणावाखाली होते. अशावेळी बाबाना एका लग्नात एक मुलगा भेटला.

त्याच्याच मोठ्या भावाचं लग्न होतं. बाबांनी त्याच्या वडिलांना लहान भावाबद्दल विचारलं. कारण धाकटाही चांगली नोकरी करत होता. मुलाने आणि वडिलांनी सकारात्मक उत्तर दिल्यावर बाबांनी लगेच मला आणि माझ्या भावाला त्या लग्नात बोलावून घेतलं. मुलगा पाच दहा मिनिटं मला भेटला. त्याच दिवशी संध्याकाळी मुलाच्या काकांचा फोन आला. त्यांनी आम्हाला सर्वांना दुसऱ्या दिवशी पूजेसाठी घरी बोलावलं होतं. त्याच वेळी मुलाची आजीही मुलीला पाहून घेईल असं सांगितलं. मला त्यांच्या घरी जाणं थोडं विचित्रच वाटलं. पण आता मीही कंटाळले होते. ठेवा कुणीतरी समोर आणि मी टाकते एकदाची लग्न करून असं मला वाटत होतं. माझ्या विचित्र मन:स्थितीमुळे मीही गेले. त्यांच्या घरी गेलो तर मुलाची आई लक्ष द्यायला किंवा बोलायलाही तयार नाही! मुलगा तर घरातच नाही! मुलाचे वडील पाच मिनिटे बोलून निघून गेले. आम्हाला काहीच कळेना की काय चाललंयं! थोडा वेळ थांबून, जेवून आम्ही निघून आलो. मुलाचे काका तेवढे व्यवस्थित बोलले.

रात्री पुन: काकांचा फोन! “आम्ही उद्या बोलणी करायला येतो.”. मला थोडं आश्चर्यच वाटलं. “ काहीही न भेटता, बोलता सरळ बोलणी करायची म्हणजे काय?” पण मी पुन: विचार केला. आता फक्त बघत रहायचं काय होतं ते.

दुसरा दिवस उजाडला. सकाळी ९ वाजता येणारे लोक १० वाजले तरी आले नाहीत.

मुलांच्या काकाचा फोन तेवढा आला की आम्ही १२ वाजेपर्यंत येतो. थोडं कामात आहोत. बाबा ठीक आहे म्हणाले. नंतर पुन्हा २ वाजता फोन आला की आम्ही ४ वाजता येतो. थोडे पाहुणे आले आहेत घरी. आम्ही सकाळी ९ वाजेपर्यंत पासून ४ वाजेपर्यन्त वाटच पाहत होतो. त्यानंतर ५ वाजता त्यांच्या काकांचा फोन आला. आम्ही येऊ शकत नाही. कारण मुलगा तयारच नाहीये. त्याला दुसरी ऑफिस मधली मुलगी आवडते. मग मात्र बाबांचा पार चढला. आम्ही सगळेच चिडलो. बाबांनी सरळ त्यांच्या वडिलांना फोन करून आमचे ४ दिवस का  वाया घालवलेत. याचा जाब विचारला.

शिवाय मुलाला जर दुसरी मुलगी आवडत होती, तर त्याने माझ्या मुलीला येऊन भेटावंच का? हे सुद्धा विचारलं पण त्यांच्याकडून सॉरी एवढच उत्तर.

त्यानंतर भरपूर चर्चा, ताणतणाव झाले आमच्या घरात. पण ते सगळं एक तास. पुन्हा सगळं विसरून गेले. होते ते चांगल्यासाठीच म्हणून आम्ही कामाला लागलो. आता माझी मन:स्थिती फार विचित्र झाली. इतकी स्थळं बघूनही काही यश येत नाही. म्हणजे आपल्याच नशिबात काहीतरी वाईट आहे. आपणच कुठेतरी कमी आहोत याबद्दल मी ठाम झाले. दिवसेंदिवस तब्येत खालावत होती. घरातलं टेन्शन वाढत होतं. आईबाबांकडे पाहून मला हतबल वाटत होते. पण माझ्या हातात काहीच नव्हते.

पुन्हा नवीन वर्ष. जानेवारी महिना आला. मन शांत करायला मी या वर्षी मावशी, आई, मामा, बहीण यांच्यासोबत कन्याकुमारीला गेले. ३१ डिसेम्बरचा सूर्यास्त आणि १ जानेवारीची पहाट (सूर्योदय ) मी इथे पहिला. विवेकानंदांची भक्त

तर मी होतेच. पण कन्याकुमारीच्या वातावरणाने मी स्तब्ध, शांत, चैतन्यमय झाले. नवीन कामाच्या उत्साहाने पुण्याला परतले. ऑफिसात नवीन उत्साहात काम करू लागले.

# स्थळ क्रमांक १७ व १८

एकाच आठवड्यात दोन स्थळे आली.. नावेही सारखीच. दिनेश आणि मंगेश! एक कोल्हापूरचा; पण पुण्यात नोकरी करणारा. दुसरा मुंबईचा पण पुण्यात घर असणारा. पाहिला आला मंगेश! त्याच शिक्षण कॉमर्स मधून झालेलं. थोडक्यात शिक्षण माझ्या बरोबरीच नव्हतं. पण दिसायला छान आणि एकुलता एक, बोलायलाही छान होता. आम्हा दोघांना १० मिनिटे बोलायला सांगण्यात आलं.

मंगेश:- माझ शिक्षण तुमच्यापेक्षा बरंच कमी आहे. तुम्हाला काही अडचण वाटते का याची?

मी:- जास्त अडचण वाटत नाही. अशिक्षित मुलापेक्षा सुशिक्षित मुलगा मिळणं महत्वाच. तो विचारांनीही चांगला असावा.

मंगेश :- मी पुण्याला येऊ शकतो. जर तुम्हाला मुंबई आवडत नसेल तर.

मी:- मुंबई मला नाहीच आवडत. पण महत्वाचं म्हणजे मला नोकरी सोडायची इच्छा नाही.

मंगेश:- ठीक आहे. मी येऊ शकतो पुण्यामध्ये.

आमचं हे सगळं आणि थोडंफार अपेक्षांचं बोलण झालं. आणि ते सगळे गेले. लगेचच संध्याकाळी त्यांचा फोन आला.” आम्हाला मुलगी पसंत आहे. तुम्ही घरी या”. मग माझे मामा मामी तर घरीच आले होते. बाबा- मामा त्यांच्या घरी जाऊन आले. त्यांना  लोक चांगले वाटले.

मंगेश येऊन गेल्यावर २ दिवसांनीच दिनेश आला. दिनेशला भेटताना मी जरा

नकारात्मक विचारांमधेच होते. कारण तो बी ई झालेला होता. आतापर्यंत जितकी ६-७ बी ई मुल येऊन गेली. त्यांचा अनुभव चांगला नव्हता.

मंगेशकडून तर होकार आलाच होता.. आता फक्त बसायचं म्हणून त्यांच्या समोर जायचं होतं. बाबांनी निर्णय घ्यायला सोपं व्हावं म्हणून दिनेशच्या मावस आजीला (मध्यस्थी) आधीच सांगितलं होतं की," आम्हाला लवकर निर्णय घ्यायचा आहे. तेव्हा मुलाकडच्या सगळ्या नातेवाईकांनी एकदाच या मुलगी बघायला." आधीचा अनुभव होता की, दर ८ दिवसांनी नवीनच कुणीतरी यायचं. बाबांनी असं सांगितल्यावर त्यांच्या कडून सुमारे १७-१८ लोक एकदम आले.

इतक्या लोकांना पाहून मला मज्जाच वाटली. अर्थात त्यांनी आधीच कल्पना दिली होती, किती लोक येणार याची. पण मला प्रश्न पडला आता मला किती प्रश्न विचारले जातील याचा! मी जाऊन बसल्यावर सुरुवात झाली अर्थात लोकांच्या मानाने प्रश्न कमीच होते.

आत्या:- स्वयंपाकाची आवड आहे का?

मी:- हो.

काकू:- ऑफिसची वेळ किती?

मी:- ९ ते ५

मामा:- कशाकशा ची आवड आहे?

मी:- वाचन, गप्पा मारणे, फिरणे.

मामा:- कोणते पुस्तक वाचते?

मी:- शक्यतो कादंबरी, चरित्र.

मामा:-शिवाजी महाराज आणि रामदास स्वामींची भेट झाली होती का? कोण्या एका लेखकाच नाव घेतलं त्यांनी.

मी:-( जरा घाबरून, कारण माझी स्मरण शक्ती तशी कमी आहे.) नक्की आठवत नाही.पण झाली होती बहुतेक.

मामा:-नाही, नव्हती झाली.

मी:-o k. मी विसरले होते. मला जास्त आठवत नाही.

त्यानंतर त्यांनी मला गजरा, ओटी, पेढे वगैरे दिले. मी आतमध्ये नेऊन ठेवला.

लगेचच आत्याने आईला विचारले. पर्णवीला गजरा माळायला आवडत नाही का?

माझी आई :- आवडतो ना!

लगेचच आई माझ्याकडे आली. तिने मला गजरा माळायला सांगितला. मला काहीच समजेना, की इतकी आईला गडबड का झाली? मी माळून घेतला.

त्यानंतर मला आणि दिनेशला बोलण्यास सांगितलं. मी दुसऱ्या खोलीत जाऊन बसले. आम्ही बोलायला सुरवात केली.

दिनेश:- ऑफिसला कशी जाते.?

मी:- आधी मीच गाडीवर जात असे.. पण आता भावाचं ऑफिस जवळच असल्यामुळे दोघही सोबतच येतो जातो.

दिनेश:- मला लहान भाऊ आहे. इन्जिनिअरिन्ग करतो. तो नंतर कदाचित नोकरीसाठी पुण्यात येईल. आमचा कोल्हापुरात पाच खोल्यांचा flat आहे. माझं स्वत:चं घर नाही. पगार मला २२ हजार आहे. थोडा कमी आहे.तेव्हा तोही विचार कर लग्न करताना. आईची निवृत्ती दहा वर्षांनी आहे. वडिलांची दोन वर्षांनी आहे. माझी ऑफिसची वेळ १०-६ आहे. सध्या मी आजी -आजोबा सोबत रहातो.

मी:-o k.

दिनेश:- तुला काही प्रश्न विचारायचे आहेत का?

मी:-सगळं काही सांगितल्यावर विचारायचं काही राहिलंच नाही. राहिला प्रश्न पगाराचा. १५ हजार घर भाडे आणि इतर खर्चाला लागतील. ७ हजार तुमच्या पगारातले उरतील, शिवाय माझा पगार आहेच ना.

दिनेश:- ठीक आहे.

असं बोलून आम्ही उठलो. दुसरे दिवशी त्यांचा मेसेज आला,"फोन करू का" म्हणून? मी आई बाबांना विचारून "हो" सांगितलं. त्यानंतर त्यांचा फोन आला.

दिनेश:- तुला काही विचारायचं आहे का? काही गोष्टी तू घरच्यांमोर विचारू शकली नसशील तर किंवा काही सांगायचं आहे का?

मी:- नाही मला विचारायचं काही नाही. पण एक सांगायचं आहे. तुमचा जो काही निर्णय असेल तो लवकर कळवा. आईबाबांच्या डोक्यात तेच तेच विचार नकोत म्हणून.

दिनेश:- माझ्या कडून होकार आहे. जर तुला काही हरकत नसेल तर पण माझे वडील कळवतील. तुमच्या घरी उद्या फोन करून.

मी:- माझी काहीच हरकत नाही. पण इतकच की जो निर्णय आपण घायचा तो मनापासून आणि आयुष्यभर  निभावण्यासाठी घ्यायचा.

दिनेश:- नक्कीच. मग मी घरी सांगतो; " तयार आहोत" म्हणून.

मी:- o k

त्यानंतर आमच्या घरी द्विधावस्था.  मंगेश की दिनेश? सगळ्यांनी निर्णय माझ्यावर सोडला. पण ९० टक्के लोक दिनेशच्या बाजूने होते. माझाही ओढा त्याचाकडे होता. कारण शिक्षण आणि प्रामाणिकपणा!

आता माझ्या समोर प्रश्न होता तो देण्याघेण्याचा. अर्थात हुंड्याचा. घरच्यांना माझे विचार माहीतच होते. त्यामुळेच ते माझ्यावर अगदी लक्ष  ठेऊन होते. त्यांना भीती होती, की हि पोरगी उग्गाच दिनेशला फोन करून काही बोलेल. माझीही  द्विधावस्था झाली.  बोलावं की नाही? एक दिवस मावशी, आई, बाबा, एवढेच नव्हे तर माझा लहान  भाऊही मला उपदेश करू लागला.

बाबा:- बेटा तू काही हुंड्याचं बोलू नकोस दिनेशला'

आई:- आपल्याला  देवाने भरपूर दिले. आम्ही शक्य तितकं देऊ तुला, तू काळजी  नको करू.

मावशी: -अग तुझ्या सुखापेक्षा  जास्त महत्वाचं आम्हाला काही नाही. सगळे मिळून हातभार लावू. पण हे चांगले स्थळ हातचे नको सोडू.

मी:- एखादा चांगला बकरा हाताला लागल्यासारखे काय करताय सगळे? मला हुंडा पटत नाही.  मी देऊ देणार नाही. तुम्ही स्वेच्छेने भरपूर देणार हे मला माहिती आहे. पण समोरच्यानी भिकारी माणसासारखं मागू नये. त्यावरून त्यांची प्रवृत्ती कळते.

लहान भाऊ :- अग ताई असं काही नसतं. तू खरच अतिविचार करतेस. सगळं नीट होईल. मी करेन जरा तडजोड.”   हे ऐकल्यावर मी तिथून उठून निघून गेले. दुसऱ्या  दिवशी ऑफिसला येऊन सरळ दिनेशला फोन केला.

मी:- तुमच्या लग्ना बद्दलच्य काय अपेक्षा आहेत?

दिनेश:- काहीच नाही. सगळ्या नातेवाईकांनी एकत्र यावं. आपल्याला आशीर्वाद द्यावा एवढेच.

मी:- सरळच विचारते,” तुम्हाला हुंडा, सोनं वगैरे हवं आहे का? कारण मी या गोष्टींच्या विरोधात आहे.

दिनेश:-अगं तू नको काळजी करूस. आमच्याही घरात या गोष्टींना विरोध आहे. विशेषतः मलाच हे पटत नाही. तेव्हा तू फक्त आनंदाने आपल लग्न साजर कर.

मी:- thank you. मला असाच मुलगा आणि घर हवं होतं.

दिनेश:- अगं देवाच्या कृपेने माझ्याकडे भरपूर आहे. तुझ्या वडिलांकडून पैसे किंवा दान घेण्याची मला काही गरजच नाही. फक्त तू समाधानी रहा.

हे ऐकून मला पुरेपूर ६ वर्ष थांबल्याचं सार्थक झाल्यासारखं वाटल.

झालं! शेवटी आमचं लग्न ठरलं. हे सगळं इतक्या लवकर झालं की काही समजलंच  नाही. एका आठवड्यात “तिलक समारंभ”  झाला. आणि मग ४ महिन्या नंतरची लग्नाची तारीख काढली. पण विशेष म्हणजे समारंभाच्या दिवशीही मला आठवत नव्हतं की माझं लग्न ज्याच्याशी ठरलं आहे तो नक्की दिसतो कसा?

मी त्याला ओळखू शकेन की नाही?  हे मी दिनेशला फोनवर सांगितलं.

तो हसून म्हणाला,काळजी करू नकोस, मला तू आठवतेस. मी तुला ओळखेन! तू कितीही लोकांमध्ये असलीस तरी!

आम्हाला मिळालेला चार महिन्यांचा काळ खूप महत्वाचा होता. एकमेकांची छान ओळख झाली. स्वभाव कळले. त्यामुळे घरच्यांबरोबरही बोलणं झालं. दोघंही एकमेकांच्या घरी रुळलो. आणि लग्न झाल्यावर काहीच जड गेलं नाही.

विशेषतः मुलीसाठी हा वेळ मिळणं खूप महत्वाचं असतं. कारण त्यांना घर, माणसं सगळेच नवीन असतात. सगळ्यांमध्ये स्वत:ला सामावून घ्यायचं असतं.

आज लग्नाला दीड वर्ष पूर्ण झाले. ज्यांनी नकार दिला किंवा ज्यांच्याशी माझं लग्न नाही होऊ शकल त्या सगळ्या स्थळांना मला “thank you” म्हणायचं आहे.

माझ्या आयुष्यातल्या “स्थळ शोधण्याच्या” त्या सहा वर्षांच्या कालावधीला पण “thank you” म्हणायचे आहे. कारण हे सगळं घडलं नसतं तर कदाचित मला इतका चांगला नवरा आणि इतक छान घर, घरातील माणसं मिळाली नसती. आज मी खूप आनंदी,समाधानी आहे.

मी सासरी नाही रुळले, तर त्यांनीच मला आपलंस करून, adjust करून घेतलं! सगळ्या आईवडिलांना आणि लग्नासाठी शोध घेणाऱ्या मुलीना मला एकच सांगावंस वाटतं. जितका वेळ लागेल, त्रास होईल, तितकं तुमचं चांगलं होईल. सोन्याला तावून सुलाखून काढल्यावर ते जास्त छान दिसतं...तसंच काहीतरी.

फक्त तुम्ही मानसिक दृष्ट्या सक्षम रहा. प्रत्येक गोष्टीची आपली एक ठराविक वेळ असते. तेव्हाच ती घडते. आणि आपल्याकडून शक्य तितके प्रयत्न तेवढे चालू ठेवा. लग्न ही आयुष्यातील खूप सुंदर गोष्ट आहे. पण तिचा बाऊ करू

नका. जबाबदारी तर वाढतेच पण घाबरून जाऊ नका. बिनधास्त झेप घ्या मोकळ्या आकाशात! खाली  पडू न द्यायला आपला जीवनसाथी आहेच सोबतीला……



# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान हा बिझनेस नाही. काही कवी लेखकांनी पुस्तक छपाईच्या खर्चाला पर्याय म्हणून हे सुरू केलं. यातून नवलेखकांना लोकांपर्यंत पोहोचण्याचा स्वस्त आणि तरीही दर्जेदार मार्ग मोकळा झाला. कित्येक दबलेले आवाज खुले झाले. अनेक ब्लॉग लेखक ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े ई पुस्तके प्रकाशित करून चाळीसहून अधिक देशांतील दोन लाख वाचकांपर्यंत पोहोचले. त्यातल्याच एक प्रियांका जोशी. त्यांनी आपल्याला लग्न जुळवताना आलेले तिखट कांदेपोह्यांचे अनुभव "नवरा: एक खोज" या पुस्तकाद्वारे प्रसिद्ध केले. त्यात आवाहन केल्याप्रमाणे अनेक मुलींनी आपले अशाच प्रकारचे अनुभव आम्हाला कळवले. काही अनुभव तर अत्यंत दारूण आणि भयावह होते. आपल्या "सु शि क्षि त" समाजात इतक्या भयंकर विचारांचे लोक आहेत हे वाचून अंगावर काटा आला. त्यातले काही लवकरच प्रसिद्ध करणार आहोत. कदाचित नांव गांवासकट. त्यातलं पहिलं पुस्तक हे. ते कसं वाटलं ते नक्की कळवा. तुमच्या उत्तराचा लेखक आणि प्रकाशक दोघांनाही फ़ायदा होईल.

साहित्य म्हणजे केवळ मनोरंजन नव्हे. आणि साहित्य म्हणजे केवळ रिपोर्टही नाही. सत्य आणि कल्पकता, वास्तव आणि मनोव्यापार यांच्या सीमारेषेवर साहित्य वावरतं. ते समाजात जास्तीत जास्त वाचलं गेलं पाहिजे. नाहीतर लोक केवळ टिव्ही सिरियल आणि सिनेमे यांच्यावरूनच जीवनाची कल्पना करतील. म्हणून तर ई साहित्य प्रतिष्ठानने प्रत्येक साक्षराला वाचक बनवायचं स्वप्न पाहिलं आहे. आणि म्हणून हे साहित्य विनामूल्य लाखों लोकांपर्यंत नेण्याचं व्रत ते चालवतात. त्यात आपली साथ हवी. आपला वाटा हवा. आपल्या ओळखीच्या सर्व लोकांना यात सामिल करायचा प्रयत्न करा. त्यांचे मेल आय डी पाठवा. esahity@gmail.com वर. किमान आठ दहा मेल आय डी द्या. त्या सर्वांना आम्ही विनामूल्य ई पुस्तकं पाठवू.

धन्यवाद

आपले विश्वासू

टीम ई साहित्य प्रतिष्ठान